


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार २९ सप्टेंबर २०२४ | अंक २९४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# लोकप्रतिनिधी खासदार बजरंग सोनवणे यांना बदनाम करण्याचे षडयंत्र कोणाचे ?

## अमर नाईकवाडे व नारायण शिरसट यांच्या याचिकेला प्रतिआव्हान याचिका दाखल.-ॲड .योगेश शेळके पाटील



बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे हे खासदार झालेपासून त्यांची बदनामी काही निवडक घटकाने चालवली असल्याचे दिसते तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी जाहीर कार्यक्रमात झालेल्या लोकसभेच्या पराभवाच वर्णन करताना सांगितले की, लोकसभा को हुई छे हजार से हार की च्योट बहोत गहिरी है. हे व अनेक षडयंत्र करून लोकप्रतिनीधी खासदारला बदनाम कारण्याचा मानस काही घटकाचा आहे. त्याद्वारे दुसऱ्याच्या आडुन कटकारस्थान करण्याचे दिसते. याचिकाकर्ते यांनी जी याचिका दाखल केली आहे ते मतदार असुन त्यांनी लोकसभा निवडणूक लढवलेली नाही. त्यामुळे त्यांना अशी याचिका दाखल करण्याचा अधिकार नाही. परंतु कोणाच्या तरी सांगण्यावरून सदरील याचिका ही फक्त संवग लोकप्रियतेसाठी दाखल केली आहे. ही याचिका दाखल करणारे कोणाचे हस्तक व लाभार्थी आहेत हे बीड जिल्ह्यातील जनतेला माहित असुन बीड जिल्हाचे खासदार हे जनतेने निवडून दिलेले आहेत व निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार व त्यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे आम्ही मतदार यांनी लोकशाही परंपरेनुसार मतदान केले आहे. त्यामुळे बीड जिल्हातील आशा बनावट व संवग प्रसिद्धीसाठी दाखल केलेल्या याचिकेमुळे आम्हा नागरिकांच्या भावनेला





त्रास होत असुन त्यामुळे आम्ही उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद येथे जेष्ठ विधीज्ञ ॲड.ज्ञानेश्वर पोकळे पाटील यांच्या मार्फत हस्तक्षेप याचिका दाखल करत आहेत. व याद्वारे मी आवाहन करतो की जिल्ह्याचा लोकप्रतिनिधींकडून व आपल्या नेत्याकडुन कसा करता येईल या दृष्टीने याचिकाकर्त्यांनी काम करावे व जिल्ह्याचा विकास करून घ्यावा असे ॲड.योगेश शेळके पाटील यांनी कळवले आहे.



# पहिल्याच दिवशी धर्मवीर २ सिनेमाची छप्परफाड कमाई, आकडा थक्क करणारा

**दैनिक लोकआरंभ//**

गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र फक्त आणि फक्त फक्त 'धर्मवीर' सिनेमाची चर्चा होती. चाहते देखील सिनेमाच्या प्रतीक्षेत होते. अखेर सिनेमा 27 सप्टेंबर रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झाला आणि चाहत्यांची प्रतीक्षा संपली. सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर चाहत्यांनी देखील सिनेमा पाहण्यासाठी चित्रपटगृहात गर्दी केली आहे. शिवाय सिनेमाच्या पहिल्या दिवसाच्या कमाईचे आकडे देखील समोर आले आहे. आकडे पाहिल्यानंतर कळत आहे की, सध्या बॉक्स ऑफिसवर 'धर्मवीर 2' सिनेमाची चर्चा रंगली आहे. रिपोर्टनुसार, 'धर्मवीर 2' सिनेमाने पहिल्याच दिवशी 1 कोटींपेक्षा अधिक कमाई केली आहे. चित्रपट विश्लेषक तरण आदर्श यांनी देखील पहिल्या दिवशी सिनेमाने केलेल्या कमाईचे आकडे जाहिर केले आहे. तरण आदर्श यांच्या ट्विटनुसार, 'धर्मवीर 2' सिनेमाने पहिल्या दिवशी 1.92 कोटी रुपयांचा गल्ला जमा केला आहे. शिवाय आज रविवार असल्यामुळे अधिक कमाई होईल... अशी देखील शक्यता वर्तवली आहे. सध्या सर्वत्र 'धर्मवीर 2' सिनेमाची चर्चा रंगली आहे.

# धनगर समाज एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी शुभमुहूर्ताची वाट पाहातयचं का ? -मिनाक्षी देवकते

## राज्यात जवळपास अडीच कोटीच्या घरात असून जवळपास २०० विधानसभा मतदारसंघावर परिणाम करणारा आहे.

**( बीड प्रतिनिधी )**

बीड राज्यातील धनगर समाजाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असणारा एस.टी.आरक्षण प्रश्नावर सरकार वारंवार चालढकल करत असून राज्यातील लाखो समाज बांधवांच्या भावनांशी खेळत आहे ही गंभीर बाब असून हा प्रश्न सरकारने योग्य वेळी निकाली काढला नाही तर सरकारला याचे परिणाम येत्या परिणाम येत्या कालखंडात भोगावे लागतील असा इशारा पत्रकाद्वारे मिनाक्षी देवकते-डोमाळे



यांनी पत्रकाद्वारे दिला आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, धनगर समाजाने एकेकाळी देशासाठी लढा देवून आपल्या प्राणाची आहुती दिलेली आहे त्याला इतिहास साक्षी आहे. आज मित्तीला राज्यातील वेगवेगळ्या भागात सर्वदूर पसरलेला धनगर समाज लोकसंख्येने राज्यात जवळपास अडीच कोटीच्या घरात असून जवळपास 200 विधानसभा मतदारसंघावर परिणाम करणारा आहे. सदर समाजाची आजपर्यंत सर्वच राजकीय पक्षांनी भुलथापा देवून फसवणूक केलेली आहे आणि हक्काच्या एसटीआरक्षणापासून आम्हाला वंचित ठेवण्यात आलेले आहे. समाजाच्या जिव्हाळ्याची मागणी विद्यमान सरकारने पुर्ण करावी अशी राज्यातील धनगर बांधवांची मागणी व अपेक्षा आहे तरी सदरील धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न लवकर न सोडवल्यास सरकारने होणाऱ्या परिणामास सामोरे जावे लागेल तसेच राज्यभर धनगर भगिनींच्या वतीने तीव्र महिला आंदोलन छेडले जाईल असेही पत्रकाद्वारे मिनाक्षी देवकते -डोमाळे यांनी म्हटले आहे

# फक्त १० आमदार निवडून येऊ द्या, मुख्यमंत्र्यांचा गणपतीच करतो; बच्चू कडू याचा इशारा



तिसरी आघाडी स्थापन केल्यानंतर आमदार बच्चू कडू यांनी आता थेट महायुती आणि महाविकास आघाडीलाच इशारे द्यायला सुरुवात केली आहे. 288 आमदार नाही, फक्त 10 जरी आमदार निवडून आले तरी आम्ही मुख्यमंत्र्यांचा गणपती केल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराच बच्चू कडू यांनी दिला आहे. ही निवडणूक काही सोपी नाही. प्रचंड पैसा फेकला जाणार आहे. पण जेव्हा सर्वसामान्य माणूस पेटून उठतो तेव्हा माझ्यासारखे चार आमदार निर्माण होतात, त्यामुळे आपल्याला विधानसभेत सामान्यांचाच आवाज पोहोचवायचा आहे, असं बच्चू कडू म्हणाले.



# घशातील पैंजण काढून डॉ.गिते यांनी वाचविले चिमुकलीचे प्राण परळीच्या जीवन हॉस्पीटलमध्ये झाली शस्त्रक्रिया

**दैनिक लोकआरंभ//**

बीड (प्रतिनिधी)- परळी येथील जिवन हॉस्पीटलमध्ये एका 3 वर्षीय मुलीच्या घशात अडकलेला पायातील पैंजण बाहेर काढून मुलीचे प्राण वाचविण्याचे काम जीवन हॉस्पीटलचे डॉ.मंगेश गिते यांनी केले त्यांना भुलतज्ञ डॉ.शुभांगी फड तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांनी साथ दिली या मुलीचे प्राण वाचल्याने तिच्या आई-वडिलांनी डॉक्टरांना आणि त्यांच्या सहकार्यांना आशिर्वाद दिले. याबाबत सविस्तर माहिती अशी की, परळी येथील आदिबा सय्यद ही 03 वर्षाची मुलगी खेळत असतांना तिच्या घशामध्ये पायातील पैंजण अडकले त्यामुळे तिला श्वाचोश्वास घेण्यास त्रास सुरु झाला. या मुलीची परिस्थिती गंभीर होती यात तिचे प्राणही जावू शकले असते परंतू जीवन हॉस्पीटलचे डॉ.मंगेश गिते यांनी समयसुचकता दाखवून ताल्काळ या मुलीला ऑपरेशन थेटरमध्ये नेले व कुठलाही वेळ जावू न देता या मुलीची यशस्वी ऑपरेशन करुन या मुलीच्या घशातील पैंजण बाहेर काढले त्यांना भुलतज्ञ डॉ.शुभांगी फड यांनी मोलाची साथ दिली. मुलगी खेळत असतांना हे पैंजण घशात अडकले होते त्याचे हुक घशाच्या टॉन्सिलमध्ये अडकून बसले त्यामुळे या मुलीचे प्राण जावू शकले असते मात्र डॉक्टरांनी शिथापिने प्रयत्न या मुलीचे प्राण वाचविले. या यशस्वी शस्त्रक्रियेतून परळी शहरात कौतुक होत आहे. डॉ.मंगेश गिते हे जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांचे जावई आहेत त्यांनी या मुलीच्या प्राण वाचवल्याबद्दल तिच्या आई-वडिलांनी त्यांना लाख-लाख धन्यवाद दिले या कामी जीवन हॉस्पीटलच्या सहकार्यांनी मदत केली.

# बालविवाह लावल्याच्या आरोपातून चंद्रभान वाघमारे सह १३ आरोपींची निर्दोष मुक्तता..ॲड. योगेश टेकाडे

**बीड (प्रतिनिधी)**

घटनेची हकीकत अशी की, दिनांक 18 जून 2020 रोजी पोलीस स्टेशन वडवणी येथे फिर्यादी नामे मल्हारी सिताराम कांबळे वय 25 वर्ष व्यवसाय खाजगी नोकरी राहणार खडकी तालुका वडवणी जिल्हा बीड हल्ली मुक्काम महाराष्ट्र नगर बिल्डिंग चार रूम नंबर 507 मानखुर्द यांनी दिलेल्या फिर्याद वरून पोलीस स्टेशन वडवणी गुन्हा रजिस्टर नंबर 128/ 2020 कलम 363,366 ,498 भादविप्रमाणे गुन्हा दाखल झाला.असून सदरील गुन्ह्याचा तपास आम्ही स्वतः करीत आहोत आम्ही तपासा दरम्यान गुन्ह्यात पीडित मुलीचे नातेवाईक यांच्याकडे गुण्याच्या अनुषंगाने विचारपूस करून त्यांचे जबाब नोंदविले असता सदर पीडित मुलीचे लग्नावेळी वय 16 वर्ष सहा महिने असल्याचे जबाबात निष्पन्न झाल्याने पोलिसांनी यातील पीडित मुलगी सृष्टी हिचा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कामखेडा तालुका जिल्हा बीड यांचे कडून निर्गम उतारा हस्तगत केला असून सदर निर्गम उताऱ्यात यातील पीडित मुलीचे वय 16 वर्ष 6 महिने असल्याचे निष्पन्न झाले आहे पोलिसांनी तपासात यातील पीडित मुलीचे लग्न हे ती अल्पवयीन असताना तिचे नातेवाईक आरोपी. चंद्रभान लेनाजी वाघमारे., मंगल चंद्रभान वाघमारे ,अनिल बाबुराव वाघमारे, विजय रमेश वाघमारे, लता रमेश वाघमारे, धर्मराज लक्ष्मण वाघमारे, सुनीता सूर्यभान वाघमारे, अक्षय सूर्यभान वाघमारे तसेच ही मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही तिचे सोबत लग्न करणारा मुलगा आरोपी नामे मल्हारी सिताराम कांबळे, पार्वती सिताराम कांबळे ,जया सिताराम कांबळे, रत्नमाला वसंत आव्हाड, नामदेव नारायण जावळे यांनी दिनांक 14 जून 2020 रोजी दहा वाजता कामखेडा येथे यातील पीडित मुलगी ही अल्पवयीन असल्याचें



माहित असतानाही लग्न लावून दिल्याचे आम्ही केलेल्या तपासात निष्पन्न झाल्याने वरील लोकांविरुद्ध कलम 9,10, 11 बालविवाह प्रतिबंधात्मक कायदा 2006 प्रमाणे कायदेशीर फिर्याद देऊन बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आला.

सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलिसांनी या आरोपीस अटक करून त्यांच्याविरुद्ध माननीय न्यायालयांमध्ये चार्जशीट/ दोषारोपपत्र दाखल केले. त्या चार शीट मध्ये ॲड. योगेश टेकाडे यांचे वकीलपत्र दाखल झाले व प्रकरण न्यायालयासमोर सुरू झाले. सदरील प्रकरणांमध्ये सरकार पक्षाकडून एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. परंतु....ॲड. योगेश टेकाडे.. यांनी मांडलेली बाजू व साक्षीदारास केलेला क्रॉस या सर्व बाबी न्यायालयाच्या लक्षात आल्या..

म्हणून या आरोपीची सदर प्रकरणातून निर्दोष मुक्तता करण्यात आली ... आरोपी तर्फे.ॲड. योगेश टेकाडे यांनी काम पाहिले त्यांना.... ॲड. राजेश नेवडे,ॲड. अजय हुंबे,ॲड. वैभव होळकर,ॲड. राजकुमार धरणे,ॲड. प्रतीक चव्हाण यांनी सहकार्य केले..

# राज्याच्या कृषी पुरस्कारांचे रविवारी मुंबईत राज्यपालांच्या हस्ते,मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत वितरण

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती



मुंबई दि. 27 सप्टेंबर 2024- महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राज्यात कृषी, फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, व्यक्ती, संस्था तसेच अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या कृषी पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम दि. 29 सप्टेंबर 2024 रोजी सायं. 5 वा. मुंबई येथील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (डोम) वरळी येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. कोविड तसेच विविध कारणामुळे प्रलंबित असलेले राज्यातील सन 2020, 2021 व 2022 या तीन वर्षातील एकूण 448 पुरस्कार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, रोजगार हमी मंत्री दादाजी भुसे, मुंबईचे पालकमंत्री व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.



या कार्यक्रमांमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी रत्न पुरस्कार (1), वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार (8), जिजामाता कृषी भूषण पुरस्कार(8), कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार(8), वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार (8), उद्यान पंडित पुरस्कार(8), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (40), पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्कार(10), युवा शेतकरी पुरस्कार(8), अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पिकांच्या राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजनेतील पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे.

कृषी पुरस्कारांच्या रकमेत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी ४ पट इतकी घसघाशीत वाढ करण्याचा निर्णय फेब्रुवारी 2024 मध्ये घेतला होता. तसेच पुरस्कार विजेत्यांना उपस्थित राहण्यासाठी दैनिक प्रवास भत्ता रकमेत सुद्धा वाढ करण्यात आली होती. या कार्यक्रमास शेतकरी- नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कृषी मंत्री धनंजय मुंडे, कृषी सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रविंद्र बिनवडे यांनी केले आहे.

# भारतीय भटक्या विमुक्त जमाती विकास संघटना बीड जिल्ह्याच्याच्या अध्यक्षपदी हनुमंत धनवटे तर उपाध्यक्षपदी बाळासाहेब सानप यांची निवड



बीड प्रतीनिधी शासकीय विश्राम गृह बीड येथे भारतीय भटक्या विमुक्त जमाती विकास संघटनेची बैठक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक सुधीर अनवले सर यांच्या अध्यक्षतेखाली काल दि 27/9/24 रोजी पार पडली.या बैठकीमध्ये भटक्यांच्या विविध प्रश्नावर चर्चा झाली. नंतर बैठकीमध्ये जिल्हाध्यक्ष पदासाठी दगडू दादा गायकवाड प्रदेश उपाध्यक्ष भारतीय भटक्या विमुक्त जमाती विकास संघटना यांनी हनुमंत धनवटे यांचे नाव बीड जिल्हाध्यक्षपदासाठी सुचवले,या नावाला डॉक्टर केशवदास वैष्णव मराठवाडा उपाध्यक्ष यांनी अनुमोदन दिले. या बैठकीस भारतीय भटक्या व मुक्त जमाती विकास संघटनेचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. हनुमंत धनवटे यांची भारतीय भटक्या विमुक्त जमाती विकास संघटना जिल्हा बीडच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल भटक्या विमुक्तांचे समाज भूषण माननीय शंकर विटकर व माननीय देवीदास गायकवाड यांनी हनुमंत धनवटे यांचा सत्कार केला. आष्टी तालुका अध्यक्ष अविनाश विटकर व बीड जिल्हा उपाध्यक्ष विकास मस्के मेजर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ.स्नेहा चांदोरकर, डॉ.श्रेयश्री गोंडाबे, डॉ . शैलेंद्र पवार,विजय भोसले, विलास देवळेकर, सय्यद मुश्ताक हाश्मी, ईसा शेख, दीपक कदम व प्रतिभा कीर्तीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

इंडियन आयकॉन सन्मान महासोहळ्याच्या 'अद्याक्षराने' शब्दश्री विलास देवळेकर यांच्या लेखणीतून उतरलेली "काव्य रचनेचा फ्लॅक्स" सर्वाचे लक्ष वेधून घेत होते. आणि त्या सोबत बऱ्याच जणांनी 'फोटोही' काढले आहेत. तसेच ह्या कार्यक्रमाचे 'आयोजन व नियोजन' उत्तम झाल्या बद्दल, उपस्थितांनी संस्थेचे कौतुक केले.

# सिडको अतिक्रमण विभागाची तळोजा परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणांवर कारवाई




**पनवेल / प्रतिनिधी**

सिडको क्षेत्रात कोणताही विकास परवाना न घेता करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे सत्र सिडकोतर्फे हाती घेण्यात आले आहेत. त्यानुसार सिडकोच्या मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागामार्फत तळोजा नोड येथे निष्कासन मोहिम राबवून तळोजा-पीएमएवाय हायवेला लागून असलेली हॉटेल क्लासिक, 8 गॅरेजेस तसेच इतर अनधिकृत रोड लगत असलेली दुकाने यशस्वीरीत्या हटविण्यात आली. सदरची अनधिकृत बांधकामे अंदाजे क्षेत्र 3000.00 चौ. मी.जागेवर सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करुन व सिडको महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली होती. त्यामुळे या अनधिकृत अतिक्रमणांविरोधात मोहिम राबवून ती निष्कासित करण्यात आली. अतिक्रमण विभागाचे अधिकारी व स्थानिक पोलीस अधिकारी व कर्मचारी, सिडको पोलीस पथक, सिडकोचे सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या सहभागाने सदरची कारवाई यशस्वीपणे राबविण्यात आली. या कारवाईसाठी प्रत्येकी 1 जेसीबी, पोकलेन, 6 जीप व 10 कामगार वापरण्यात आले.

फोटो : अतिक्रमण कारवाई

# बीड जिल्हयातुन १२९६ प्रकरणे लोकन्यायालयामध्ये निकाली

**बीड प्रतिनिधी :-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून व आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. 28 सप्टेंबर 2024 रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकूण 1296 प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.

बीड जिल्हयातुन न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण 8259 प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, 138 एन.आय.ॲक्टच्या



प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी 461 प्रकरणे निकाली निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण 48801 प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी 835 प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण 1296 प्रकरणे निकाली निघाली आहेत व यामध्ये 15 कोटी 25 लाख 41 हजार 10 रू. एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत.

सदरील लोक न्यायालयाच्या प्रसंगी आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, जी. जी. सोनी सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह, मा. व्ही.एच.पाटवदकर साहेब, जिल्हा न्यायाधीश -2, तसेच इतर पॅनल प्रमुख, बीड जिल्हा वकील संघाचे प्र. अध्यक्ष तथा उपाध्यक्ष मा. ॲड. नितीन वाघमारे यांच्यासह वकील संघाचे सर्व पदाधिकारी जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती.

तसेच न्यायालयीन अधिकारी व कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# मराठवाडा केसरी बक्षीस कोण पटकवणार.. शेतक-यांमध्ये उत्सुकता...! बीड बैलगाडा शर्यतीचे मैदान सज्ज..!

**( बीड प्रतिनिधी )**

बीड येथे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने आज संपन्न होत असलेल्या मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीचे भव्य मैदान सुसज्ज झाले असून, बीडचे मैदान कोण गाजवणार आणि मराठवाडा केसरी सोनालीका ट्रॅक्टर कोण पटकावणार ? याकडे महाराष्ट्रातील लाखो हौशी शेतकरी बांधवांमध्ये उत्सुकता शिगेला पोहचली आहे. बीड येथे सकाळी 09.00



वा. तळेगाव शिवार,भोंडवे पेट्रोल पंपासमोर मैदान सुरु होणार आहे. रंजक प्रेक्षणीय बैलगाडी शर्यतीचा आनंद घेण्यासाठी शेतकरी बांधवानी प्रचंड संखेने उपस्थित राहावे असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे. बैलगाडा शर्यतीसाठी सात धावपट्ट्याचे मैदान तयार केले असून, गट पद्धतीने ही शर्यत संपन्न होणार आहे. प्रत्येक फेरीत सात बैलगाड्या धावतील, यात विजयी स्पर्धक बैलगाडा सेमी फायनल मध्ये सात बैलगाडा धावतील, अंतिम फेरी सात बैलगाडा यांची असून, त्यातून प्रथम येणारा सोनालिका ट्रॅक्टर म्हणजेच मराठवाडा केसरी पटकावणार आहे. बहुचर्चित मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीमध्ये महाराष्ट्रातील नामांकित बैल बकासुर, सर्जा, सोन्या, हिंदकेसरी यासारख्या धडाकेबाज बैलजोड्या शर्यतीत सहभागी होणार आहेत. शर्यतीचे उत्कृष्ट नियोजन करण्यात येत असून, वैद्यकीय व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, पिण्याचे पाणी, बैलांना पाणी आदीसह प्रेक्षकांच्या सुरक्षेसाठी बॅरेकेट बसवण्यात आले आहेत. तरी जिल्ह्यातील हौशी शेतकरी बांधवानी बैलगाडीचा थरार पाहण्यासाठी बहु संखेने उपस्थीत राहावे असे आवाहान राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. ऑनलाईन नाव नोंदणीकरिता संपर्क – अविनाश नवले- 9921114954, 9130887888, अजय सावंत - 9359005879

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने परळी विधानसभा मतदार संघात होत असलेल्या शेतकरी संवाद यात्रेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा

## तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज

परळी (वार्ताहर) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सौ सुदामतीताई गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली व युवक नेते सुनील भैया गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संवाद यात्रा होत आहे.या यात्रेमध्ये परळी मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी केले आहे. परळी विधानसभा मतदारसंघांत ही शेतकरी संवाद यात्रा 9 दिवस 423 किलोमीटर 86 गावं सरासरी अंदाजे 150000 दीड लाख नागरिकांशी थेट संवाद होईल. या यात्राची आज 29 सप्टेंबर रोजी परळी मतदारसंघातील पहिले गाव मौजे डिग्रस येथील कासार समाजाचे कुलदैवत कालिका मातेचे दर्शन व आशीर्वाद घेऊन सुरुवात होईल. ही यात्रा परळी मतदारसंघात 9 दिवस होणारा आहे . ही संवाद यात्रा परळी विधानसभा मतदारसंघातील पुढील गावातून मार्गक्रमण करेल त्यामध्ये डिग्रस, पोहनेर, कासरवाडी ,जळगव्हाण, रामेवाडी , रामवाडी तांडा,



पिंपरी (बु) ,हिवरा, इमान तांडा, गोवर्धन येथे मुक्काम ३० सप्टेंबर हसनाबाद, औरंगपूर, तपोवन, पाडोळी, सिरसाळा ,वाका ,मोहा, वंजारवाडी, करेवाडी ,सरफराज, कलावती तांडा, मालदार तांडा, गर्देवाडी, कावळ्याचीवाडी, बोधेगाव येथे मुक्काम. 1 ऑक्टोबर नागपिंप्री, मांडेखेल, अस्वलांबा, वानटाकळी, दौनापूर, नागापूर, माळीहिवरा, तडोळी ,वडखेल, सेलू, गाडे पिंपळगाव येथे मुक्काम २ ऑक्टोबर पांगरी, टाकळी देशमुख ,कौठळी ,बेलांबा वागबेठ, संगम ,सेलु परळी, लोणी, वडगाव दादाहरी येथे मुक्काम ३ ऑक्टोबर मिरवट, मांडवा ,सारडगाव ,खोडवा सावरगाव, दैठणा घाट ,गुटेवाडी, सौंदना, खापरटोन ,कातकरवाडी, उजनी येथे मुक्काम ४ ऑक्टोबर निरपणा ,बाभळगाव, कुसळवाडी, धर्मापुरी, लाडझरी, मूर्ती, पट्टीवडगाव ,पिंप्री, चंदनवाडी, हातोला येथे मुक्काम 5 ऑक्टोबर लिमगाव, बर्दापूर, नांदगाव ,सुगाव ,मुडेगाव, राडी, राडी तांडा, धानोरा बुद्रुक येथे मुक्काम 6 ऑक्टोबर अकोला, तडोळा, सातेफळ, वाघाळा, सायगाव, भारज, गीता, जवळगाव येथे मुक्काम 7 ऑक्टोबर मुरंबी, तळणीष तेलगणा, अंबलटेक, चांदापूर श्री क्षेत्र प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेऊन या यात्रेची सांगता होईल या यात्रेमध्ये परळी मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी केले आहे.

## समाजाच्या दृष्टीने आणि शासनासाठी वास्तू उपयुक्त ठरेल -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पनवेल / प्रतिनीधी देशातील पहिली अॅडव्होकेट अकॅडमी महाराष्ट्रात साकारली जात आहे याचा निश्चित आनंद आहे. यासाठी महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे मनःपूर्वक अभिनंदन! शासनाने या अकॅडमी उभारणीसाठी जागा दिली आहे. समाजाच्या दृष्टीने आणि शासनासाठी ही अकॅडमी उपयुक्त ठरेल यात शंका नाही. अॅडव्होकेट अॅक्ट सुधारित करण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. 28) केले. बार असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्या वतीने तळोजा येथे उभारण्यात येणाऱ्या अॅडव्होकेट अकॅडमी आणि रिसर्च सेंटरचे भूमिपूजन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते झाले. त्यानंतर नेरूळ येथील डॉ. डी.वाय. पाटील लॉ कॉलेजमध्ये झालेल्या समारंभात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. या कार्यक्रमास राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि राज्यसभा खासदार मनन कुमार मिश्रा, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ, गोव्याचे महाधिवक्ता देविदास पांगम, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे चेअरमन संग्राम देसाई, माजी चेअरमन तथा विद्यमान सदस्य पारिजात पांडे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या अॅडव्होकेट अकॅडमी आणि रिसर्च सेंटरसाठी 50 लाख रुपयांची देणगी धनादेशाच्या स्वरूपात दिली.

## शिवश्री धनंजय शेंडगे यांची मराठा सेवा संघाच्या जिल्हा अध्यक्ष पदी निवड



बीड प्रतिनिधी मराठा सेवा संघाच्या बीड जिल्हा अध्यक्ष धनंजय शेंडगे यांची पदी निवड झाल्याबद्दल बीड येथे संभाजी ब्रिगेड च्या वतीने सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिला , व यावेळी उपस्थित संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी उपस्थित होते

## रमेशराव आलाट यांच्यासह शेकडो युवकांचा मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश

**माजलगाव ( प्रतिनिधी)** दि.28 : माजलगाव तालुक्यातील डाके पिंपरी वस्ती येथील युवा कार्यकर्ते रमेशराव आलाट यांच्यासह मित्रमंडळाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश केला. माजलगाव येथील मोहनराव जगताप यांच्या संपर्क कार्यालयात प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला यावेळी रमेशराव आलाट यांच्या मित्र मंडळाच्या सर्व युवकांनी मोहनराव जगताप यांच्या पाठीमागे संपूर्ण ताकद उभा करण्यासाठी हा प्रवेश करत असल्याचे सांगितले. यावेळी मोहनराव जगताप त्यांनी सर्व युवकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवतील असे सांगितले. तसेच मोहनराव जगताप यांनी सर्व युवकांचा यथोचित सन्मान केला. यावेळी रमेशराव आलाट यांच्यासह अनंत आलाट, ज्ञानेश्वर आलाट, गणेश आलाट, हनुमान आढागळे, मुंजा शेरकर, बाबुराव आलाट, लव आलाट, बाळू आलाट, राजभाऊ आढागळे, संभाजी आलाट, दत्तात्रय आलाट, बळीराम आलाट, शिवाजी आडगळे, भागवत घोंगडे, लखन इंगोले,लखन आलाट, अशोक पारवे,संतोष आलाट, संदिपान आलाट, रणजीत आलाट, बाळासाहेब आलाट, शुक्लेश्वर डाके, मोहन डाके, बाबासाहेब आलाट, कैलास आलाट, शिवाजी आलाट, यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमाप्रसंगी संतोषराव यादव, सुरेशराव एरंडे,माजी नगराध्यक्ष नानाभाऊ शिंदे, नानासाहेब घोडके,मा.नगरसेवक राम जगताप, शरदराव यादव, ईश्वर होके,जगदीशराव बादाडे,,राजेभाऊ वापटे,बप्पा देशमुख, गोविंद इतापे,अंकुश शिंदे, फेरोज इनामदार, अमोल सोळंके,शंकर शेंडगे, कल्याण जाधव, अॅड.शेजुळ,प्रकाश चव्हाण,सिद्धेश्वर डाके, सरपंच अविनाश गोंडे, भालचंद्र सोळंके, राजूभाई सय्यद,रामेश्वर पठाडे,सर्जेराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अशोक डकांचेही शक्ती प्रदर्शन पिठाची गिरणी सुद्धा नसताना लोकांची गर्दी पाहून अशोक डक झाले भावुक

माजलगाव -प्रतिनीधी माजलगाव विधानसभेत इच्छुक उमेदवारीची भाऊ गर्दी दिवसेंदिवस वाढत चालली असतानाच दोन्ही पवारांचा वरदहस्त माझ्यावर तुमच्या सहकार्याने राहिला असून मला ही आमदार होण्याची इच्छा आहे असे मत आयोजित मित्र परिवार संवाद मेळाव्यात बोलताना मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक हे आक्षरभावुक होऊन यांनी व्यक्त केली.

१९८० पासून स्व.गोविंदराव डक यांनी घालून दिलेल्या शिकवणीनुसार माझा राजकीय प्रवास सुरु आहे कार्यकर्त्यांना देण्यासाठी थोडं असे कोणतेही साधन उपलब्ध नसताना देखील डक परिवारातील एक सदस्य म्हनून मी समाजसेवा कायम करीत आहे त्याचेच फळ म्हणून शरद पवार आणि अजित पवार यांनी मला मुंबई बाजार समितीचे सभापती पद देऊन काम करण्याची संधी दिली त्या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न मी करत आहे माझी शक्ती तुम्ही आहात आणि येणाऱ्या विधासभेच्या निवडणुकीत मी तुमच्या जीवावर या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करण्याची मागणी करणार असल्याचे मत आयोजित मित्रपरिवार संवाद मेळाव्यात सभापती अशोक डक यांनी केली असून आता पुन्हा एक नवा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात हबुक ठोकण्यास तयार झाला आहे.मेळा व्यास मोठ्या संख्येने मित्रपरिवार उपस्थित होता. दोन्ही पवारांकडे लक्ष माझा राजकीय कारकिर्दीत मला शरद पवार आणि अजित पवार या दोघांची मोठी साथ मिळाली आहे त्यांच्यामुळेच मला मुंबई बाजार समितीचे सभापती पद मिळाले आहे असे म्हणत दोन्ही पवारांना गोंजरून अशोक डकांनी निवडणूक लढण्याची घोषणा केली मात्र गट स्पष्ट केला नाही.

## संजय राऊत खोटं बोलतात हे पुन्हा सिद्ध झाले..!

अंबाजोगाई (प्रतिनिधी) संजय राऊत नांवाचे सद्गृहस्थ रोज उठुन सकाळी सत्ताधाऱ्यांवर बेताल बडबड व खोटे आरोप करीत नरेटिव्ह प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. ज्यामुळे सर्वसामान्य जनतेत संभ्रम निर्माण होतो. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचं बोलणं साफ खोटं असतं. केवळ रेटुन बोलल्यामुळे माध्यमाद्वारे समाजापर्यंत जावुन पोहोचतं. महायुतीच्या सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या बोलण्याकडे लक्ष्य देवु नका. कारण, हे खोटारडे सद्गृहस्थ असल्याचे अनेकदा जाहिर केले. मात्र माध्यम प्रभावामुळे लोकांनाही खरं वाटायचं. काल मेघा किरीट सोमय्या यांच्या अब्रुनुकसानीच्या दाव्यात माझगाव न्यायालयाने राऊतांचे आरोप खोटे ठरवत त्यांना पंधरा दिवसाची शिक्षा सुनावली. तेव्हा कुठं आता सर्वांनाच ही व्यक्ती खोटे बोलते याची प्रचिती आली. न्यायदेवतेच्या शिक्कामोर्तबानंतर संजय राऊतांच्या अंगी खऱ्या अर्थाने रोज माध्यमांच्या समोर येवुन आता बेताल बडबड करण्याची नैतिकता राहिलीच नसल्याचा दावा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केला. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात प्रवक्ते कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, मा.माझगाव कोर्टाने अब्रुनुकसानीच्या दाव्यात अर्थात मेघा सोमय्या प्रकरणात केलेले खोटे आरोप चुकीचे असल्याचं निरीक्षण करत त्यांना पंधरा दिवसाची शिक्षा ठोठावली. मुळात त्यांचं असलेले प्रकरण काय होतं ? यापेक्षा त्यांना झालेली पंधरा दिवसाची शिक्षा ही राऊतांचा खोटारडेपणा सिद्ध करणारी म्हणावी लागेल. मागच्या अनेक वर्षांपासून रोज उठायचं आणि सकाळी माध्यमांसमोर बेताल बडबड करत केंद्र आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांवर खोटे आरोप करत संभ्रम निर्माण करायचा. सुरूवातीला त्यांच्या बोलण्यावर लोकांचा विश्वास बसला असेल. मात्र कालांतराने लोकांनी देखील हा माणुस खोटा आहे लक्षात घेवुन त्यांच्या बेताल बडबडीकडे दुर्लक्ष्य केलं.



ठाणे : दिवा स्थानक पुर्व येथील १५० मी. अंतरावर असलेल्या हातगाड्या व फेरीवाल्यांवर ठाणे महानगरपालिकेचे दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त अक्षय गुडधे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली. (फोटो - संतोष पडवळ ).

## धुनकवाड ग्रामपंचायतने वस्ती आस्तित्वात नसताना देखिल हायमास्टच्या नावाखाली तिस लाख रुपयांचे बील अदा करु नका

### पाराराम यादव यांची जि.प.मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या कडे तक्रार

धारूर (प्रतिनिधी):- ग्रामपंचायत गावठाणे हद्दीमध्ये वस्ती दाखवताच येत नाही तरी पण धुनकवाड नं - 1 वनं 2 या गावामध्ये ग्रामसेवकाला हाताशी धरून सरपंचांनी धनगरवस्ती, वंजारी वस्ती व इतर एक वस्ती गावामध्येच दाखवून निकृष्ठ दर्जाचे हायमास्ट दिवे बसविले व या तीन वस्त्यांचे मिळुन तिस लाख रुपयांचे ईस्टीमेट तयार केले. परंतु वस्ती नसतानाच गावामध्येच खालच्या दर्जाचे म्हणजे निकृष्ठ हायमास्ट बसवले याची तक्रार या गावचे पाराराम गोविंद यादव यांनी रितसर तक्रार गटविकास अधिकारी धारूर व जिल्हा , परिषद बीड चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केलेली असुन सदरिल गावामध्ये येऊन स्पॉट पंचनामा करावा व धुनकवाड गावचे ग्रामसेवक यांची जो पर्यंत कामाची चौकशी होत नाही तो पर्यंत त्यांची बदली करण्यात येऊ नये अशी तक्रार देखिल त्यांनी केलेली आहे. तसेच ज्या ठिकाणी हायमास्ट बसविण्याचे ठिकाण आहे त्या ठिकाणी न बसविता चुकिच्या



ठिकाणी बसवण्यात आले आहेत. ज्या प्रकारे हायमास्टचे अंदाजपत्रक बनवले त्यानुसार काम देखिल झालेले नाही. तरी याची वरिष्ठ पातळीवर चौकशी होऊन दोषीवर कडक कार्यवाही करावी व 30 लाख रुपयांचे बील चौकशी होई पर्यंत देण्यात येऊ नये तसे काही झाले तर चुकीच्या ठिकाणी बसवलेल्या हायमास्ट दिव्याच्या पोलवर चढुन आंदोलन करू अशी इशारा श्री पाराराम गोविंद यादव यांनी दिला आहे.

## पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरुच ; मावेजा न दिल्याने शेतकऱ्यांनी अडवल्या गाड्या बेलगाव येथील घटना:- डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश प्रतिनिधी**

लिंबागणेश:- ( दि.२८ ) बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असुन बीड तालुक्यातील बालाघाटावरील बेलगाव येथील शेतकरी सुमंत कोंडीबा कोळपे आणि ईश्वर परमेश्वर कोळपे यांनी पवनचक्कीचे काम करण्यासाठी आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या गाड्या अडवून धरल्या आणि आमच्या जमिनीचा मोबदला मिळाल्याशिवाय आमच्या शेतातुन गाड्या जावू देणार नाहीत अशी आक्रमक भूमिका घेतली. रेणु कंपनीच्या कंत्राटदाराने पोलिसांना फोन करून बोलावून घेतल्यानंतर शेतक-यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांना फोनवरून कल्पना दिल्यानंतर प्रत्यक्ष घटनास्थळी धाव घेत पवनचक्कीचे कंत्राटदार आणि पोलिस प्रशासन यांच्याशी संवाद साधला त्यानंतर कंत्राटदाराने संबंधित शेतकऱ्यांना मोबदला दिल्याशिवाय आम्ही पुढील काम करणार नाही असे आश्वासन दिले.

शेतीचा मोबदला न दिल्याने पवनचक्की कंपन्यांच्या गाड्या अडवल्या:- सुमंत कोळपे,ईश्वर कोळपे आमच्या शेताची अग्रीमेंन्ट कागदपत्रे तयार करून घेतली.मावेजा दिलाच नाही.तुमच्या शेतातुन गाड्या घालणार नाहीत असे सांगितले. ईतर शेतकऱ्यांना मावेजा दिला.परंतु आम्हाला दिला नाही.आता सध्या आमच्या शेतातुन गाड्या घालण्याचा प्रयत्न करत असताना आम्ही गाड्या अडवल्या आहेत.आमची यापूर्वी सुद्धा फसवणूक झाली आहे म्हणून आमचा यांच्यावर भरवसा नाही. आम्ही शेताचा मोबदला दिल्यानंतरच आमच्या शेतातुन गाड्या जाऊ देऊ. अशी आक्रमक भूमिका सुमंत कोळपे आणि ईश्वर कोळपे यांनी घेतली आहे.

पोलिस प्रशासन आणि पवनचक्कीचे कंत्राटदार यांच्याशी संवाद साधल्यानंतर मोबदला देऊ म्हणाले:- डॉ.गणेश ढवळे




शेतकऱ्यांनी पवनचक्की कंत्राटदारांच्या गाड्या अडवल्यानंतर कोळपे बंधुंनी माझ्याशी फोनवरून संवाद साधत मदत करण्याची विनंती केली. घटनास्थळी जाऊन पोलिस प्रशासन आणि कंत्राटदार यांच्या समक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधला. कंत्राटदार यांनी कोळपे बंधुंना शेताचा मावेजा देण्याचे मान्य करत नंतरच काम करू असे आश्वासन डॉ.गणेश ढवळे यांना दिले.

## कै. वैजनाथ गायकवाड यांच्या पुण्यतिथी निमित्त जि. प. प्रा. शाळा घाटेवाडी येथे शालेय साहित्याचे वाटप.



केज (प्रतिनिधी): तालुक्यातील घाटेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये गावातील ज्येष्ठ नागरिक कै. वैजनाथ आप्पा गायकवाड यांच्या ११ व्या पुण्यतिथी निमित्त शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी चटई तसेच इतर साहित्य देण्यात आले. पेशाने शिक्षक असलेले श्री बाबुराव वैजनाथ गायकवाड आपल्या वडिलांच्या निधनानंतर प्रत्येक वर्षी त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ आपल्याच गावातील विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे शालेय साहित्याचे वाटप करत असतात. कै. वैजनाथ आप्पा गायकवाड यांचे सुपुत्र श्री बाबुराव गायकवाड हे परभणी जिल्ह्यात प्राथमिक शाळेमध्ये अध्यापनाचे काम करत आहेत. सुरवातीपासूनच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी काहीना काही आपले देणे म्हणून एक चांगले कार्य करीत आहेत. कै. वैजनाथ आप्पा गायकवाड हे गावातील एक आदर्श नागरिक होते. त्यांनी आपल्या जीवनात सामाजिक बांधिलकी जपत चांगले कार्य केले आहे. समाजामध्ये कधी फूट पडू दिली नाही तसेच गावातील तंटा गावातच मिटवणे अशा प्रकारचे अनेक सामाजिक कार्य त्यांनी केले आहे. या प्रसंगी भारत गरबडे, शरद शिंदे, बाबासाहेब गायकवाड यांच्यासह शाळेतील मुख्याध्यापक , शिक्षक वृंद तसेच गावातील अबालवृद्ध उपस्थित होते.

दैनिक
# लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ

रविवार २९ सप्टेंबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# महायुतीच्या जागावाटपाबाबत ५ तास वर्षावर खलबतं

**केंद्रीय निवडणूक आयोगाच्या महाराष्ट्रातील आढाव्यानंतर राज्यात घडामोडींना वेग आला आहे.**

## मुख्यमंत्री शिंदे काय म्हणाले?

नाशिक दौऱ्यावर असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणूक आयोगाच्या महाराष्ट्र दौऱ्यावर भाष्य केलं. निवडणूक आयोगाने जी काही नियमावली आहे. त्याप्रमाणे लोकशाहीमध्ये नियमाने कामकाज झालं पाहिजे. नियमाने लोकशाहीमध्ये निवडणूक झाली पाहिजे, त्याप्रमाणे निवडणूक आयोग काम करतोय. लोकशाहीमध्ये पारदर्शकता असली पाहिजे. त्यांनी असंही म्हटलं आहे की मागच्या निवडणुकीत लोकांना त्रास झाला, गैरसोय झाली. ती यावेळी होता कामा नये निवडणूक आयोगाने चांगला निर्णय घेतला आहे, त्यांचं स्वागत करतो, असं एकनाथ शिंदे म्हणाले.



**मुंबई /प्रतिनिधी**

महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक तोंडावर आहे. अशात राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुतीची काल रात्री बैठक पार पडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी ही बैठक झाली. पाच तास ही खलबतं झाली. यात आगामी विधानसभा निवडणुकीवर चर्चा झाली. महायुतीच्या जागावाटपावर चर्चा झाली. कोण किती जागा लढणार? कोणती जागा कुणाकडे असणार? यावर या बैठकीत चर्चा झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात ही बैठक झाली. 'वर्षा'वर महायुतीची बैठकराज्यातील विधानसभा निवडणुकीच्या आधी केंद्रीय निवडणूक आयोगाची टीम महाराष्ट्रात आली. त्यांनी आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर आता लवकरच राज्यात विधानसभा निवडणूक होण्याची चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर महायुतीची काल बैठक झाली. पाच तास जागावाटपावर चर्चा झाली. त्यामुळे आता महायुतीचं जागावाटप कधी जाहीर होतं हे पाहावं लागेल.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे काल नाशिक दौऱ्यावर होते. नाशिक शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेले मुंबई नाका इथं उभारण्यात आलेल्या महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यांचा अनावरण करण्यात आलं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची हजेरी होती. हा दौरा आटोपल्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री मुंबईत आले. त्यानंतर वर्षा निवासस्थानी बैठक पार पडली.

# कमी वयामध्ये अभिजीत पवार यांनी घेतली पत्रकार क्षेत्रामध्ये उंच भरारी

बीड तालुक्यातील एक छोटेसे चाकरवाडी गाव हे गाव महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखले जाते. खर तर सांगायचं म्हटले तर या गावाची ओळख माऊली दादांची चाकरवाडी म्हणुन ओळखले जाते. याच गावात रामेश्वर पवार यांचे राहत होते. अतिशय गरीब परिस्थिती रामेश्वर पवार यांची होती. याच पवार कुटुंबात 29 सप्टेंबर 2002 रोजी अभिजीत पवार यांनी जन्म घेतला.



अभिजीत पवार यांची आई मीराबाई आणि वडील रामेश्वर पवार, वडील अपंग आहेत, आई मीराबाई यांनी गावातील ऊसतोड टोळीत काम करुन घर चालवत असत आणि वडील अपंग असल्यामुळे त्यांची गावात पान टपरी होती, यातून मिळणाऱ्या पैशातून घर चालायचे. अभिजीत पवार यांना एक भाऊ ( निखिल पवार), आणि बहीण ( प्रियंका पवार ) आजी ( जाईबाई पवार ) हे सहा व्यक्तींचं कुटुंब होते. अभिजीत पवार यांना प्राथमिक शिक्षणासाठी गावातीलच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या ठिकाणी शाळेत टाकले. अभिजीत पवार यांचे प्राथमिक शिक्षण पहिली ते चौथी पर्यंतचे हे गावातीलच शाळेत झाले. प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर सोबत असणारे विद्यार्थी हे बाहेर गावी काही गेले परिस्थिती गरीब असल्यामुळे त्यांचे पुढील शिक्षण हे गावामध्येच आ. विनायक मेटे साहेब यांची संस्था बाळनाथ विद्यालय होती. पाचवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण हे बाळनाथ विद्यालय मध्ये संपन्न झाले. दहावी मध्ये हुशार असल्यामुळे 82.60 टक्के गुण घेतले. पुढील शिक्षण हे लातुर, बीड, पुणे या ठिकाणी करावे असे वाटायचे परंतु घरची परिस्थिती बेताची असल्याने पुढील शिक्षण हे चाकरवाडी पासुन अगदी काही अंतरावर असलेल्या येळंबघाट येथिल बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या ठिकाणी बारावी पर्यंतचे शिक्षण घेतले. गावापासून चार किलोमीटर अंतर होते. मग जा ये करण्यासाठी जुनी सायकल विकत घेतली. मग सायकल वर येळंबघाट ते चाकरवाडी प्रवास हा केला. बारावी सायन्स होते. बारावी मध्ये क्लास लावायचे होते. क्लास लावण्यासाठी पैसे नाहीत म्हणुन कॉलेज चे क्लास केले आणि बारावी उत्तीर्ण झाली. मग बारावी नंतर करायचे काय खूप विचार केला. काहीच सुचत नव्हता परिस्थिती गरीब उच्च शिक्षण कसे घ्यायचे हाच मनामध्ये विचार होता. मग गावामध्ये एक आत्महत्या झाली त्या आत्महत्येची बातमी करण्यासाठी मराठा वादळ हे यूट्यूब चॅनल असणारे पत्रकार अशोक काळकुटे गावामध्ये आले. बातमी झाल्यावर त्यांना भेटलो. त्यांना म्हणालो मला पण पत्रकारिता करायची आहे. मग बारावी नंतर पत्रकारिता क्षेत्रात आलो. मग सुरुवातीला दैनिक सुर्योदय नावाचे दैनिकात काम करण्याची संधी ही चाकरवाडी प्रतिनिधी म्हणुन भेटली. त्या वेळेस कसलाच अनुभव नसताना एका गावचे प्रतिनिधित्व भेटल्यावर खूप आनंद झाला. मग पुढे काही कारणास्तव सूर्योदय सोडले. मग पुढं काय करायचे अनुभव थोडाच, डिग्री नाही, काहीच सुचत नव्हते. मग यूट्यूब



## गरीब कुटुंबातून पत्रकारितेत आलेले नेतृत्व - गोकुळ इंगोले

गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही सोबत काम करत आहोत. काम करत असताना कधीच परकीय जाणीव भासून दिली नाही. आम्ही अनेक वर्षांपासून सोबत काम करत असताना मित्र नाही तर भावाची साथ मिळाली. बातमी संदर्भात असो किंवा काहीही काम असले तरीही सोबत काम करण्याची आमची सवय होऊन गेली आहे. सामाजिक कार्य करण्यात अभिजीत हा अग्रेसर असतो. त्याने त्याच्या गेल्या वाढ दिवसानिमित्त वाढदिवस हा केक हारे तुरे न स्वीकारता सामाजिक उपक्रमाने साजरा केला. आम्ही खुप हट्ट केला तरीही त्याने सांगीतले हा वाढ दिवस मी सामाजिक उपक्रमाने साजरा करणार आहे. एक गरीब कुटुंबातून आलेला हा पोरगा एका संपादक पदापर्यंत पोहचला. खुप अडीअडचणी आल्या तरीही न डगमगता मागे न हटता त्याने उंच भरारी घेत आज स्वतःचे दैनिक सुरु आहे. एक आदर्श घेण्याजोगता आहे. अणि कमी वयामध्ये त्याने भरपूर असे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त केलेले आहेत. अभिजीत तुला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..

चॅनल न्युज ची एडिटिंग येत असल्याने संपर्कात असणाऱ्या तीन ते चार न्युज चॅनल वाल्यांना फोन करुन त्यांचे एडिटिंग चे कामे घेतली मग त्यातून अनुभव येत राहिला. मग पुढे वसंतराव काळे महाविद्यालयात पत्रकारिता साठी प्रवेश घेतला. मग पुढे 2021 साली स्वतचं न्युज चॅनल आणि पेपर सुरु केला, आर एन आय साठी अप्लाय केले. आणि काही दिवसातच टायटल व्हेरिफिकेशन झाले आणि दादांच्या आशीर्वादाने माऊली नाव मिळाले. अणि बीड माऊली दैनिक आणि चॅनल सुरु केले. 2021 साली कोणत्याही नेत्याची किंवा सेलिब्रिटीची ओळख नव्हती. अधुन मधुन पत्रकार परिषदेसाठी जात असल्यामुळे लाहनातल्या लहान ओळखणारे मेटे साहेब यांची ओळख होती. मग 1 जानेवारी 2022 साली चाकरवाडी मध्येच कार्यालय उद्घाटन आणि पेपर आणि चॅनल ची सुरूवात केली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com